महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई, येथील विद्यार्थी निवासाकरीता आशीमारा हौसिंग कंपनीकडील ५१५ बेड्स भाडेतत्त्वावर घेण्यास मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## शासन निर्णय क्रमांकः- भाडेक-२०२६/ई-१५८२५८१/विशि-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २० मे, २०२६.

वाचा :-

१. कुलसचिव, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांचे दि.०७.०२.२०२६ रोजीचे पत्र.

२. शासन निर्णय, वित्त विभाग विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दि.१७.०४.२०१५.

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई चे कामकाज एमटीएनएल, पवई येथील २ रा, ३ रा, ६ वा व ४ थ्या माळ्यावर भाडेकराराने सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठातील विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था आशीमारा हौसिंग यांच्याकडील कांजूर मार्ग व चांदिवली येथे करण्यास दि.१९.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कराराची मुदत दि.३०.०७.२०२५ रोजी संपुष्टात आल्याने विद्यापीठाने दि.३१.०७.२०२५ ते दि.३०.०७.२०२७ या कालावधीसाठी आशीमारा हौसिंग कंपनीकडील कांजूर मार्ग व चांदिवली येथील ५१५ बेड्स भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्याची विनंती केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी यांनी सदरहू जागेबाबतच्या दराची परिगणना करुन दिली आहे. त्याआधारे संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारानुसार आशीमारा हौसिंग यांच्याकडील ५१५ बेड्स भाडेतत्वावर घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई, येथील विद्यार्थी निवासाकरीता आशीमारा हौसिंग कंपनीकडील कांजूर मार्ग व चांदिवली येथील ५१५ बेड्स दि.३१.०७.२०२५ ते दि.३०.०७.२०२७ या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त कालावधीतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई व आशीमारा हौसिंग यांच्यातील भाडेकरारासाठी दि.३१.०७.२०२५ ते दि.३०.०७.२०२६ या कालावधीसाठी रु.१०,६८,९७,१९०/- व दि.३१.०७.२०२६ ते दि.३०.०७.२०२७ या कालावधीसाठी रु.११,३२,०१,३८४/- भाडेरकमेस मान्यता देण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई व आशीमारा हौसिंग प्रा.लि. मुंबई यांच्यातील भाडेकरारात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी कुलसचिव, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई व आशीमारा हौसिंग प्रा.लि. मुंबई यांची राहील.

४. सदरहू शासन निर्णय हा वित्त विभाग दि.१७.०४.२०१५ वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ भाग-पहिला, उपविभाग - १, अनुक्रमांक १० महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील क्रमांक ११५ आणि महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील नियम १४७ (क) नुसार कार्यालयासाठी जागा भाड्याने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. उक्त प्रयोजनार्थ येणारा खर्च “मागणी क्र.- डब्ल्यू-२, प्रधानशीर्ष-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०३-विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०२-विद्यापीठांना सहाय्य, -(००) (२१) विधी विद्यापीठाचा विकास (२२०२ जी ९५९), ३१ सहाय्यक अनुदाने” या लेखाशिर्षाखाली त्या-त्या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून खर्ची टाकण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०५२०१६३९४९४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.05.20 16:40:34 +05'30'

**( प्रताप पां. लुबाळ )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा.कुलपती, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
८. महालेखापाल, (लेखा परीक्षण) -२, महाराष्ट्र, नागपूर.
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.कुलसचिव, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई..
११.अवर सचिव (अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१४. निवडनस्ती (विशि-२).